सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक)
उद्योग,ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,प्रशासकीय इमारत,
३रा मजला,रामकृष्ण चेंबुरकर मार्ग,चेंबुर,मुंबई-४०० ०७१.
स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

| ईमेल: eislbnlift.nrg-mh@gov.in | | दुरध्वनी : ०२२-२५२८५९६७ |
|---|---|---|
| जा.क्र./विनि(सअमंवउनि)/तांत्रिक शाखा / १०८२ / | २०२४ | दिनांक:- १८/१०/२०२४ |


# परिपत्रक

**विषय :-** दि. २३.११.२०२४ व दि.२४.११.२०२४ रोजी घेण्यात येणा-या विद्युत पर्यवेक्षक व दि.२७.११.२०२४ पासून घेण्यात येणा-या तारतंत्री परिक्षेच्या वेळापत्रकात अंशतः फेरबदल करणेबाबत.

**संदर्भ :-** १) अनुज्ञापक मंडळातर्फे माहे नोव्हेंबर २०२४ मध्ये घेण्यांत येणा-या विद्युत पर्यवेक्षक व तारतंत्री परिक्षेबाबतची दि. २३.०८.२०२४ रोजीची जाहिरात.

२) केंद्रिय निवडणूक आयोगाची दि.१५.१०.२०२४ रोजी प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूकीचा कार्यक्रम.

३) मुख्य विद्युत निरीक्षक,उ.ऊ.का व खनिकर्म विभाग,मुंबई यांचे पत्र क्र.मुविनि/तांत्रिक/१५७९/२०२४ दिनांक १६/१०/२०२४

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार अनुज्ञापक मंडळामार्फत दि. २३.११.२०२४ व दि.२४.११.२०२४ रोजी विद्युत पर्यवेक्षक व दि.२७.११.२०२४ पासून तारतंत्री परिक्षा घेणे प्रस्तावित होते. मात्र संदर्भ क्र.२ अन्वये दि.१५.१०.२०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेनसार केंद्रिय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रिया हि दि.२०.११.२०२४ रोजी तसेच मतमोजणी प्रक्रिया दि २३.११.२०२४ रोजी राबविण्यात येणार असल्याचे नमुद केले आहे. त्यानुषंगाने निवडणूक कार्यकाळामध्ये आपल्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात निवडणूक कामाकरीता अधिग्रहीत करण्यांत येते.

वरील सर्व बाबींचा विचार करता, माहे नोव्हेंबर २०२४ मधील विद्युत पर्यवेक्षक परिक्षा दि. २३.११.२०२४ व दि.२४.११.२०२४ तसेच तारतंत्री परिक्षा दि.२७.११.२०२४ पासून घेणे आपल्या विभागास शक्य होणार नाही. त्यामुळे संदर्भ क्रमांक ३ च्या मंजुरीनुसार सदरची विद्युत पर्यवेक्षक परिक्षा ही दि.३०.११.२०२४ व दि.०१.१२.२०२४ रोजी तसेच तारतंत्री परिक्षा ही दि.०५.१२.२०२४ पासून घेण्यात येणार आहे.

(अभिजित ल.कस्तुरे)
विद्युत निरीक्षक
(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उदवाहन निरीक्षक)
चेंबुर (पूर्व), मुंबई-७१

प्रत :- १) मुख्य विद्युत निरीक्षक,उ.ऊ.का व खनिकर्म विभाग,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) अधीक्षक अभियंता,उ.ऊ.का व खनिकर्म विभाग,मुंबई /पुणे/छ.संभाजीनगर/नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) सर्व सदस्य अनुज्ञापक मंडळ यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) कार्यालीन नस्ती/जावक नस्ती.